Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# २१ व्या शतकातील भारतीय महिला उद्योजक : एक अभ्यास

**सौ. गायत्री अविनाश रवंदळे,** संशोधक विद्यार्थी
**डॉ. विशाल शिवाजीराव करपे,** मार्गदर्शक, लोकनेते माणिकराव गावीत महाविद्यालय, विसरवाडी

## प्रस्तावना

भारतीय अर्थव्यवस्था ही अनेक घटकांवर आधारित आहे. या प्रमुख घटकांवर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. भारत देश महासत्ता होणार याविषयी अनेक तज्ञ, विचारवंत, शास्त्रज्ञ, राजकीय नेते अंदाज व्यक्त करत आहेत. आणि या दृष्टीने विविध स्तरावर देशात नियोजन करण्याचा प्रयत्नही केला जात आहे. मात्र त्यामध्ये महिलांच्या रूपात जवळपास ५० टक्के प्रमाण असलेल्या कर्तुत्ववान मानवी श्रमाचा उपयोग देशाच्या विकास प्रक्रियेत केला तर उद्योजकता आहे असे म्हणता येईल. महिलांना स्वातंत्र्य, समान संधी देण्याच्या फक्त गप्पागोष्टी न करता प्रत्यक्ष कृतीत उतरवणे आवश्यक आहे. यादृष्टीने समाज, गाव, राज्य, देशाच्या व्यवस्थेचा विचार करण्यापेक्षा समाजातील कुटुंब प्रमुखांनी आपल्या कुटुंबातील महिलांना आणि त्यांच्या कर्तुत्वाला वाव देणे महत्त्वाचे आहे. तसे पाहिले १९ वे व २० वे शतक महिलांच्या कर्तुत्वाला वाव मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. या काळात भारतातील महिलांच्या जीवनात अनेक अमुलाग्र बदल घडून आले आहेत. महिलांचे व्यक्तिमत्व बदलले. सामाजिक, सांस्कृतिक कौटुंबिक अस्तित्व अर्थपूर्ण बनले. समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होऊ लागला. महिलांना स्वातंत्र्य मिळाल्याची जाणीव होऊन आपापल्या क्षमता ओळखून विविध क्षेत्रात संधी शोधून पदार्पण केले. एकेकाळी रूढी, प्रथा, परंपरा यांच्यात अटकलेल्या महिलांनी संधी मिळताच आपल्या क्षमता सिद्ध करून समाजाला दाखवलेले आहे.

भारतात सन १९७० पासून महिलांनी उद्योग क्षेत्रात प्रवेश केला असला तरी त्याचे प्रमाण नगण्य होते. १९७५ नंतर सरकारी धोरणात मोठ्या प्रमाणात बदल झाले. त्यामुळे महिलांमध्ये जागरूकता निर्माण झाली. १९८० नंतरच्या काळात महिलांचा उद्योग क्षेत्रातील सहभाग जास्त प्रमाणात दिसू लागला. आज लघुउद्योग क्षेत्रात महिला उद्योजकांची संख्या १,०६,७२१ (१०.११ टक्के) आहे. या सर्व महिला उद्योग क्षेत्राशी संबंधित आहेत. त्यापैकी १३ टक्के महिला लघुउद्योग क्षेत्रात नोंदणीकृत आहेत आणि उर्वरित ८७ टक्के अनोंदणीकृत आहेत.

## संशोधनाचे उद्दिष्टे

१. महिला उद्योजकाचा अर्थ समजून घेणे.
२. यशस्वी महिला उद्योजकांचा अभ्यास करणे.
३. महिलांच्या विविध क्षेत्रातील कार्यांचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक असलेली माहिती दुय्यम माहितीच्या आधारे संकलित करण्यात आलेली आहे. यामध्ये विविध पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र, संकेतस्थळ इत्यादींचा उपयोग करून संबंधित आवश्यक असलेले माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

## महिला उद्योजकाचा अर्थ व व्याख्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

१९९१ च्या औद्योगिक धोरणात पहिल्यांदाच महिला उद्योजकाची व्याख्या करण्यात आली. "महिला उद्योजक म्हणजे महिलांनी स्थापन केलेले किंवा महिलांकडून ज्या उद्योगाचा कारभार चालविला जातो असा उद्योग होय."

जे एस शुंपीटर यांच्या मते, "ज्या स्त्रीने नवनिर्मिती, अनुकरण, व्यवसाय स्वीकारला तिला महिला उद्योजक असे म्हणतात."

**महिला उद्योजकांचे प्रकार**

आज भारतीय महिला जवळपास सर्वच क्षेत्रात पुरुषांसोबत असून काही क्षेत्रात त्या पुरुषांच्या पुढे आहेत. दहावी, बारावी परीक्षच नाही तर अनेक स्पर्धा परीक्षेमध्ये त्यांनी पुरूषांना मागे टाकले आहे. महिलां भारतीय उद्योगमध्ये लक्षणीय प्रगति करत आहेत. महिला उद्योजकांचे प्रकार खालील प्रमाणे आहेत.

**१) सामाजिक उद्योजक** - या महिला समाजाच्या कल्याणासाठी काम करतात. त्यांच्याद्वारे सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याचे कार्य केले जाते मग ते शिक्षण, आरोग्य आणि महिलांच्या हक्क याबाबत कार्य करत असतात. उदा. आदिती गुप्ता यांनी मेनस्ट्रोपीडिया सुरू करून महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल शिकण्यास मदत केली.

**२) नाविन्यपूर्ण उद्योजक** - नाविन्यता म्हणजे नवीन कल्पना. नवीन उत्पादन, नवीन सेवा तयार करणे. उदा. फाल्गुनी नायर यांनी कंपनी सुरू करून सौंदर्य उत्पादनाची ऑनलाईन खरेदी -विक्री कशी केली जाते हे शिकवण्यास मदत केले.

**३) लघुउद्योजक** - या क्षेत्रातील महिला दुकाने, बेकरी, स्थानिक स्टोअर सारखे छोटे व्यवसाय चालवतात. इतर उद्योजकांच्या तुलनेत त्यांचे व्यवसाय लहान असले तरी समाजात त्यांची नक्कीच मोठी भूमिका आहे.

**४) इंट्राप्रेन्यूअर्स** - अशा अनेक महिला आहेत ज्या मोठ्या कंपन्यांमध्ये काम करतात आणि त्यांच्या कंपन्यांना त्यांच्या नवीन कल्पना वाढवण्यास मदत करतात. ते इंट्राप्रेन्यूअर्स असे म्हणून ओळखले जातात.

**भारतातील यशस्वी महिला उद्योजक**

भारतातील वुमन इन बिजनेस या अहवालात असे म्हटले आहे की, ज्या कंपनीमध्ये महिला या सीइओ आहेत किंवा संचालक मंडळात आहेत अशा कंपन्या भागधारकांना अधिक लाभांश मिळवून देतात असे आढळून आले आहे.

**१) निलिमा मिश्रा** - निलिमा मिश्रा यांची सामाजिक कार्याबरोबर एक उद्योजिका म्हणून देखील ओळख आहे. महिलांच्या रोजगार आणि स्वावलंबनाला चालना देण्यासाठी त्यांनी महिला बचत गटांची स्थापना केली. निलिमा मिश्रा यांनी दारिद्र्यरेषेखालील किंवा गरजू, गरिबीत जगणाऱ्या, बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून विविध कामांमध्ये सहभागी करून घेतले आहे. दुग्धोत्पादनात शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा त्यांनी अभ्यास केला आणि दूध उत्पादकांना न्याय देण्यासाठी भव्य डेअरी स्थापनेची संकल्पना मांडली. बहादरपूर येथे महिलांचा बचत गट त्यांनी तयार केला. तेथे बचतगटाच्या माध्यमातून गोधडी बनवण्यास सुरुवात केली. बहादरपूरची गोधडी विदेशात लोकप्रिय झाली आहे. निलिमा यांनी पूर्व खानदेश व पश्चिम खानदेशात बचत गटाचे जाळे तयार करून महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला. निलिमा मिश्रा यांनी ग्रामीण उद्योग आणि महिलांना रोजगार देण्यासाठी सन २००० मध्ये 'सिस्टर निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन'ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी गावात बचत गट स्थापन करण्यास सुरुवात


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

केली. निलिमा मिश्रा यांना २०११ मध्ये ' रॅमन मॅगसेसे पुरस्कार ' आणि २०१३ मध्ये ' पद्मश्री ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .

**२) सावित्री जिंदल -** भारतातील पहिल्या क्रमांकाच्या सर्वात श्रीमंत महिला उद्योजिका म्हणून सावित्री जिंदल यांचा उल्लेख केला जातो. सावित्री जिंदाल या स्टील व पावर लिमिटेड कंपनीचा कारभार यशस्वीपणे सांभाळत. नुकत्याच फोबर्सने जाहीर केलेल्या यादीत जिंदल यांचा श्रीमंत महिला उद्योजकांच्या यादीमध्ये जगात ४४ वा क्रमांक आहे. फोबर्स इंडिया रिच लिस्ट मध्ये सावित्री जिंदल या चौथ्या स्थानावर आहे. संपत्तीत एकूण ४६ टक्के वाढीसह त्यांची एकूण संपत्ती २४ अब्ज $ एवढी झाली असून सावित्री जिंदल जगातील प्रसिद्ध महिला उद्योजिका आहेत. सावित्री जिंदल यांच्या उद्योगांच्या समूहांमध्ये JSW स्टील, JSW एनर्जी, जिंदाल स्टील अँड पॉवर, जिंदाल सॉ, जिंदाल स्टेनलेस आणि गुंतवणूक कंपनी, JSW होल्डिंग सारख्या सूचीबद्ध कंपन्यांचा समावेश आहे. ओपी जिंदाल ग्रुपकडे पोर्ट ऑपरेटर JSW इन्फ्रास्ट्रक्चरची ८३ टक्के मालकी आहे. जिंदाल समूह प्रामुख्याने वीज निर्मिती व पोलाद उत्पादनात कार्यरत आहेत.

**३) किरण मुझुमदार-शॉ -** यांनी बायोकॉन इंडिया समूहाच्या अध्यक्षा आणि व्यवस्थापकीय संचालक (१९७८) या नात्याने एका अग्रगण्य उपक्रमाचे नेतृत्व केले. वैद्यकीय संशोधनात प्रगती करण्यासाठी भारताच्या स्वदेशी वैज्ञानिक प्रतिभेचा उपयोग केला. सन २००१ मध्ये कोलेस्ट्रॉल कमी करणाऱ्या रेणूच्या निर्मितीसाठी युएस फूड अँड ड्रग्स ऍडमिनिस्ट्रेशन (FDA) चे मान्यता मिळवणारी बायोकॉन ही पहिली भारतीय कंपनी बनली. त्यानंतर कंपनीचा झपाट्याने विस्तार झाला. २०२३ मध्ये या कंपनीच्या नफ्यामध्ये सुमारे ४२ टक्के वाढ झाली. बायोकॉनच्या सर्वात उल्लेखनीय उपक्रमांपैकी जगातील पहिल्या तोंडी वापरल्या जाणाऱ्या इन्सुलिन उत्पादनाची चाचणी आणि विकास करून त्यांचे उत्कृष्ट कार्य सुरूच ठेवले. तसेच मुझुमदार - शॉ अनेक पुरस्काराच्या मानकरी ठरल्या. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने (जागतिक आर्थिक राजकीय आणि सामाजिक विकासासाठी आंतरराष्ट्रीय परिषद) मुझुमदार यांना सन २००० मध्ये, "तंत्रज्ञान पायनियर" मान्यता दिली. आरोग्य सेवा आणि जीवन विज्ञान क्षेत्रातील सर्वोत्तम उद्योजक म्हणून घोषित केले. त्यांना २००४ मध्ये *इकॉनॉमिक टाइम्सने* वर्षातील सर्वोत्कृष्ट उद्योगपती म्हणून सन्मानित केले. २००५ मध्ये मुझुमदार-शॉ यांना औद्योगिक जैवतंत्रज्ञानातील त्यांच्या अग्रगण्य कार्यासाठी भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक पद्मभूषण पुरस्कारही मिळाला .किरणला अलीकडेच EY एंटरप्रेन्योर ऑफ द इयर इंडिया २०१९ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आणि त्यांना EY वर्ल्ड आंत्रप्रेन्योर ऑफ द इयर २०२० म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. तसेच इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) द्वारे 'हेल्थ केअर मधील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. आरोग्यसेवा क्षेत्रातील तिच्या अमूल्य योगदानाची आणि अनुकरणीय कार्याची दखल घेऊन FICCI-Healthcare Excellence Awards २०१९ मध्ये जीवनगौरव पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. USIBC इंडिया आयडियाज समिट २०१८ मध्ये यूएस-इंडिया बिझनेस कौन्सिल ग्लोबल लीडरशिप अवॉर्डने सन्मानित करण्यात आले आहे, त्यांच्या भूमिका आणि क्षेत्रांमधील योगदान आणि नेतृत्वाची दखल घेऊन फिन्स्टाईन इन्स्टिट्यूट फॉर मेडिकल रिसर्च, यूएसए तर्फे त्यांना 'ऍडव्हान्सिंग वुमन इन सायन्स अँड मेडिसिन (AWSM) अवॉर्ड फॉर एक्सलन्स' २०१७ ने गौरविण्यात आले. प्रतिष्ठित हुरुन अहवालाद्वारे किरण मुझुमदार यांना २०१७ साठी 'भारतातील सर्वात आदरणीय उद्योजक' म्हणून घोषित करण्यात आले आहे. आणि सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाने एक अपवादात्मक महिला कर्तृत्ववान म्हणून तिचा सत्कार केला आहे. भारतातील, USD १ अब्ज


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

नेटवर्थ गाठणारी पहिली भारतीय व्यावसायिक महिला. जागतिक अर्थव्यवस्थेसाठी जर्मनीस्थित कील इन्स्टिट्यूटने त्यांना व्यवसायासाठी प्रतिष्ठित '२०१४ ग्लोबल इकॉनॉमी पुरस्कार' प्रदान केला आहे. तिला भारतातील दोन सर्वोच्च नागरी सन्मान पद्मश्री (१९८९)आणि पद्मभूषण (२००५) पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांची एकूण संपत्ती २९,०३० कोटी रुपये आहे.

**४) उपासना टाकू -** तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे लोक ऑनलाइन व्यवहारांकडे वळणे ही काळाची अत्यावश्यक गरज होती. ऑनलाइन पेमेंटची पद्धत लोकप्रिय होत असताना, अनेक कंपन्यांनी ई-वॉलेटची कल्पना मांडली. या क्षेत्रात उभी असलेली एक कंपनी म्हणजे MobiKwik. हा एक भारतीय फिनटेक युनिकॉर्न आहे ज्याने वापरकर्त्यांसाठी डिजिटल पेमेंट सोपे आणि अधिक सुलभ केले आहे. MobiKwik च्या यशामागे उपासना टाकू या दृढनिश्चयी महिलेचा हात आहे. या कंपनीची स्थापना सन २००९ मध्ये उपासना टाकू आणि बिपिन प्रीत सिंग यांनी केली. कंपनीच्या उभारणीत आणि तिला अधिक उंचीवर नेण्यात टाकूने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली MobiKwik फिनटेक उद्योगातील एक प्रमुख खेळाडू बनले. डिसेंबर २०२४ मध्ये कंपनी सार्वजनिक सबस्क्रिप्शनसाठी तिचा IPO उघडून सार्वजनिक केली. बिहार आणि उत्तर प्रदेशमधील दृष्टी या ग्रामीण मायक्रो फायनान्स एनजीओ सोबत काम केले. ग्रामीण भारतातील आव्हाने आणि संधींची सखोल माहिती मिळवून स्थानिक समुदायांना सक्षम बनविण्यास मदत केली. MobiKwik हे भारतातील आघाडीचे मोबाइल वॉलेट आणि वित्तीय सेवा प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. ॲप वापरकर्त्यांना मोबाइल रिचार्ज, बिल पेमेंट आणि बँक ट्रान्सफर यांसारखी पेमेंट करून देते. हे तत्काळ डिजिटल कर्ज, डिजिटल सोन्यामध्ये गुंतवणूक पर्याय, म्युच्युअल फंड, मुदत ठेवी आणि क्रेडिट कार्ड बिल सेटलमेंट यासारख्या सेवा देखील देते. MobiKwik चे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पॉकेट UPI. हे वापरकर्त्यांना त्यांची बँक खाती लिंक न करता UPI पेमेंट करू देते. उपासना यांच्या नेतृत्वाखाली MobiKwik ने आपल्या सेवांचा विस्तार केला आहे. ज्यामुळे ते भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे प्लॅटफॉर्म बनले आहे. MobiKwik ने मोठे टप्पे गाठले, ऑक्टोबर सन २०२१ मध्ये युनिकॉर्न स्टार्टअप बनले आणि डिसेंबर २०२४ मध्ये त्याचा IPO लॉन्च केला. 'किक अप स्ट्रॉंग प्रयत्न करून मर'या मंत्राने तिला कठीण काळात लक्ष केंद्रित करण्यात मदत केली आहे. तिच्या मते, दृढता ही गुरुकिल्ली आहे. म्हणूनच तिचे कठोर परिश्रम आणि स्टार्टअप समुदायाची सेवा करण्याच्या इच्छेमुळे ती अनेक इच्छुक उद्योजकांसाठी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व बनले आहे. प्रेरणादायी भारतातील पेमेंट कंपनीचे नेतृत्व करणारी पहिली महिला फोर्ब्स "आशियातील महिला पाहण्यासाठी (२०१६)"असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ऑफ इंडिया (ASSOCHAM) द्वारे सर्वोत्कृष्ट महिला उद्योजक पुरस्कार, सन २०१७ आणि २०१८ मध्ये तिला भारतातील पेमेंट गेटवे स्टार्टअपचे नेतृत्व करणारी पहिली महिला म्हणून भारताच्या राष्ट्रपतींकडून पुरस्कार मिळाला. फोर्ब्स एशिया पॉवर २५ व्यावसायिक महिला (२०१९ व २०२४) मध्ये तिला 'अन स्टॉपेबल आयकॉन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आणि भारतातील आघाडीच्या टेक संस्थापक आणि भारतातील शीर्ष १५ सर्वात श्रीमंत स्वयं-निर्मित महिलांपैकी एक म्हणून ओळखली गेली. २०२४ मध्ये, त्यांना CNBC-TV18 द्वारे भारतातील आघाडीच्या टेक संस्थापक आणि भारतातील शीर्ष १५ सर्वात श्रीमंत स्वयंनिर्मित महिलांपैकी एक म्हणून ओळखले गेले. डिसेंबर २०२४ पर्यंत, MobiKwik चे मूल्य सध्या IPO किंमत श्रेणीवर आधारित १९७ दशलक्ष $ (१६६० कोटी रु.) आहे. IPO नंतर ५७२ कोटी रु. नवीन निधीसह त्याचे मूल्यांकन २६४ दशलक्ष $ पर्यंत वाढेल. तथापि, सन २०२१ मधील ९२४ दशलक्ष $ च्या सर्वोच्च मूल्यापेक्षा हे सुमारे ७१.६ टक्के कमी आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**५) स्वाती भार्गव -** यांना CashKaro आणि EarnKaro च्या सह-संस्थापक म्हणून ओळखतात. भारतातील सर्वात मोठे कॅशबॅक आणि कूपन ॲप आणि भारतातील पहिले सोशल कॅशबॅक ॲप, UK-आधारित कॅशबॅक व्यवसाय - Pouring Pounds सुरू केला. त्यानंतर स्वाती भार्गव यांनी भारतात ही संकल्पना आणली आणि २०१३ मध्ये कॅशकारो लाँच केले. आज कॅशकारोचे १८ दशलक्षाहून अधिक डाउनलोड्स आहेत, ही एकमेव VC-बॅक्ड कॅशबॅक साइट आहे, सीरीज A मध्ये १५ दशलक्ष $ निधी जमा केला. IIT, ISB, ET वुमन एम्पॉवरमेंट समिट, TiECon, TEDx, AdTech, IAMAI Forums, Economic Times Conferences, Niti Aayog आणि दिल्ली सरकारच्या उपक्रमांमध्ये मुख्य वक्ता म्हणून त्यांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली आहे. जून २०१९ मध्ये ४० वर्षाखालील फॉर्च्युन ४० च्या यादीत स्थान मिळवले. कॅशकारोला काम करण्यासाठी एक उत्तम ठिकाण म्हणून प्रमाणपत्र मिळाले, कॅशकारोने इंडिया एफिलिएट समिटमध्ये 'बेस्ट एफिलिएट अवॉर्ड' जिंकला. पुरस्कृत ईकॉमर्स उद्योगातील सर्वोत्कृष्ट सेवा ऑफर करणाऱ्या कंपनीसाठी भारताचा पहिला डिजिटल महिला पुरस्कार, सध्या H2 इंडियाच्या सह-अध्यक्ष - डिजिटल उद्योगासाठी जागतिक नेतृत्व, नेटवर्क CNBC-TV 18 द्वारे शीर्ष तरुण व्यावसायिक महिलांमध्ये नामांकित आहे. यापैकी एक म्हणून ओळखले गेले. Iamwire.com द्वारे प्रमुख १० महिला उद्योजिका, भारतीय ईकॉमर्स उद्योगातील ४ महिला ट्रेलब्लेझर्समध्ये सन्मानित इकॉनॉमिक टाईम्स, २०११ मध्ये यूके मधील आशियाई महिला अचिव्हमेंट अवॉर्ड्ससाठी शॉर्टलिस्ट, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमद्वारे एक तरुण ग्लोबल लीडर म्हणून नामांकित आहे. स्वाती भार्गव यांची एकूण संपत्ती २ दशलक्ष $ आहे. तिला फॉर्च्यून इंडिया ४० अंडर ४० मध्ये वैशिष्ट्यीकृत केले गेले. सन २०१६ मध्ये उद्योजकाला टॉप यंग बिझनेस वुमनमध्ये नामांकन मिळाले.

**जागतिक आणि भारतीय महिला उद्योजकांची तुलना**

जागतिक स्तरावर उद्योग क्षेत्रामध्ये पुरुष वर्गाचे वर्चस्व आहे. संपूर्ण जगात महिला उद्योजकांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत १/४ आहे. बदलत्या आधुनिक काळामध्ये आर्थिक आणि सामाजिक वातावरणामुळे महिला उद्योजकांची संख्या वाढताना दिसत असले तरी तिचे प्रमाण अल्प आहे. जगातील प्रमुख ७७ देशांच्या अभ्यासावरून काढलेल्या महिला उद्योजकांच्या निर्देशांकावरून दिसून येते की, सर्वाधिक महिला उद्योजक निर्देशांक युनायटेड स्टेट्स (अमेरिका) या देशाचा असून या देशाचा निर्देशांक ८२.९ टक्के आहे. युनायटेड स्टेट्स नंतर दुस-या व तिस-या स्थानावर अनुक्रमे ऑस्ट्रेलिया व यूनायटेड किंगडम या देशाचा नंबर लागतो. या अहवालानुसार भारताचा ७० वा क्रमांक लागत असून भारताचा महिला उद्योजक निर्देशांक २५.३ एवढा कमी आहे.

**तक्ता क्र. १ : जगातील सर्वाधिक महिला उद्योजक निर्देशांक असलेले प्रमुख १० देश**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

| अ. क्र. | देश | निर्देशांक (टक्के) |
|---|---|---|
| १. | युनायटेड स्टेट्स | ८२.९% |
| २. | ऑस्ट्रेलिया | ७४.८% |
| ३. | युनायटेड किंग्डम | ७०.६% |
| ४. | डेन्मार्क | ६९.७% |
| ५. | नेदरलँड | ६८.९% |
| ६. | फ्रान्स | ६८.८% |
| ७. | आइसलँड | ६८.०% |
| ८. | स्वीडन | ६६.७% |
| ९. | फिनलँड | ६६.४% |
| १०. | नायजेरिया | ६६.३% |

**स्रोत**-GEDI (द ग्लोबल इंटरप्रननांशिप अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट रिपोर्ट २०१५)

जागतिक महिला उद्योगाचा विचार करता भारत इतर देशांच्या तुलनेत खूप पिछाडीवर आहे. भारतात यापूर्वी महिला उद्योजकतेला योग्य ती चालना मिळाली नाही. त्यामुळे आपल्याकडे बोटावर मोजता येतील अशा काही निवडक महिला उद्योग क्षेत्रात आपला ठसा उमटवू शकले आहेत. भारतात महिलांच्या उद्योजकतेला अद्याप आवश्यक तितके प्रोत्साहन मिळत नसल्याचे 'मास्टरकार्ड इंडेक्स ऑफ वुमेन अंटरप्रेनर्स या अहवालात नमुद करण्यात आलेले आहे. या अहवालानुसार ५४ देशाच्या अर्थव्यवस्थांचा आढावा घेण्यात आला आहे. त्यात भारताला ४१.७ गुणांक मिळून त्याचा क्रमांक ४९ वा लागला आहे. मास्टरकार्ड ने न्युझीलंडला ७४.४, कॅनडाला ७२.४ व अमेरिकेला ६९.९ गुणांक दिले आहे. भारतात महिलांना उद्योजक बनण्यासाठी कमी संधी आहेत. त्याचप्रमाणे एखाद्या उद्योगाचे नेतृत्व करण्यासाठीही कमी वाव आहे असे हा अहवाल सांगतो. शिक्षणाचा अभाव, तंत्रज्ञानविषयक अज्ञान, संस्कार व चालिरीतींचा नको इतका पगडा यामुळे भारतात महिलांमध्ये उद्योजकता रूजविण्यात अडचण येत आहे.

**भारताच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भूमिका**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकता (MSME) मंत्रालयाच्या निरीक्षणावरून १००० सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग घटकांमध्ये २० टक्के वाटा महिला उद्योजकांचा आहे. मात्र नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनी या संघटनेच्या अहवालानुसार हा वाटा मात्र ९ टक्के आहे. नॅशनल सॅम्पल सर्वे ऑर्गनायझेशन या संस्थेच्या आर्थिक सांख्यिकी अहवालानुसार देशातील १४ टक्के उद्योग हे महिलांचे आहेत. म्हणजे ५८.८ दशलक्ष उद्योगांपैकी साधारणत ९ दशलक्ष उद्योग हे महिलांचे आहे. यापैकी बहुतेक लघु व सूक्ष्म उद्योग आहेत त्यापैकी ६९ टक्के स्वयं अर्थपूर्ण आहेत. उद्योग क्षेत्रात महिलांमध्ये अधिक सक्षमता असूनही जागतिक पातळीवर


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

भारताचा क्रम हा नेहमीच खालच्या पातळीवर आहे. भारतात २०.३७ टक्के महिला आहेत. एमएसएमई मालक जे कामगार शक्तीच्या २३.३ टक्के आहेत. ते अर्थव्यवस्थेचा कणा मानले जातात. McKinsey Global च्या मते, श्रमशक्तीमध्ये महिलांचा सहभाग वाढवून भारत संभाव्यपणे जागतिक GDP मध्ये ७०० अब्ज US $ जोडू शकतो. उत्पादन आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची टक्केवारी पुरुषांच्या तुलनेत जास्त आहे. या क्षेत्रांना सामान्यतः कुटुंबांना गरिबीतून बाहेर येण्यास आणि उच्च कौटुंबिक उत्पन्नामध्ये योगदान देण्याचे श्रेय दिले जाते. शिवाय, आर्थिक वर्ष ८.८ मध्ये महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण २१ टक्क्यांनी वाढले, जे देशाच्या उज्ज्वल संभावनांवर प्रकाश टाकते. महिलांच्या नेतृत्वाखालील व्यवसाय अर्थव्यवस्थेला मोठी चालना देतात. भारतात ४३२ दशलक्ष कार्यरत वयाच्या महिला आणि १३.५-१७.३ दशलक्ष महिलांच्या मालकीचे व्यवसाय आहेत जे २२-२७ दशलक्ष लोकांना थेट रोजगार देतात. याशिवाय अनेक व्यवसायांवर महिलांचे नियंत्रण आहे. भारतीय स्त्रिया स्वतंत्र आहेत आणि त्यांना स्वतःची सुरुवात करण्याची मजबूत प्रेरणा आहे व्यवसाय. बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपच्या मते, महिलांनी स्थापन केलेल्या किंवा सह-स्थापना केलेल्या स्टार्ट-अप पाच वर्षांच्या कालावधीत १० टक्के अधिक संचयी कमाई करतात. या स्टार्ट-अपमध्ये अधिक समावेशी कार्यसंस्कृती आहे आणि पुरुषांपेक्षा ३ पट अधिक महिलांना रोजगार आहे. शिवाय महिलांच्या नेतृत्वाखालील व्यवसाय पुढील पाच वर्षांत ९० टक्के वाढतील असा अंदाज आहे.

**महिला उद्योजकांसाठी शासन आणि केलेल्या उपाय योजना**

भारत देशातील सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांमध्ये महिलांचा सहभाग वाढवावा यासाठी शासनाने काही उपाययोजना केलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे-

**1) स्टार्टअप योजना** - ही एक सरकारी योजना आहे. याचा उद्देश महिला व इत उपेक्षित समुदायांमध्ये उद्योजकतेला चालना देणे हे आहे. हे ग्रीनफिल्ड व्यवसायाच्या स्थापनेसाठी किमान एक अनुसूचित जाती जमाती कर्जदार व प्रत्येक बँकेच्या शाखेत किमान एक महिलेला बँक कर्ज देते. एससी/एसटी महिला उद्योजकाकडे किमान ५१ टक्के मालकी असणे आवश्यक आहे महिला उद्योजकांना त्यांचा लहान व्यवसाय सुरू करण्यासाठी दहा लाख ते १ कोटी पर्यंत कर्ज मिळू शकयोजना

**2) मुद्रा योजना** - ही योजना भारतातील एक सरकारी उपक्रम आहे. याचा उद्देश उद्योजकतेला चालना देणे आणि सूक्ष्म व लघु उद्योगांना आर्थिक सहाय्य प्रदान करणे हे आहे. या योजनेत महिला उद्योजकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. कारण देशातील महिलांच्या उद्योजकतेला सक्षम करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. १० लाख पर्यंतच्या कर्जासाठी कोणतेही कारणाची आवश्यकता नाही. ही योजना महिला उद्योजकांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देते.

**3) उद्यम शक्ती पोर्टल** - एमएसएमई मंत्रालयाने कमी किमतीची उत्पादने व सेवा तयार करून सामाजिक उद्योग जगतेला चालना देण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. हे व्यवसाय नियोजन, प्रशिक्षण, मार्गदर्शन, बाजार संशोधन, यासाठी अर्थसहाय्य देते. उद्यम शक्ती पोर्टलवर विदेशी गुंतवणूक, सुलभ करण्याचे पोर्टल, स्टार्ट अप इंडिया, लाईफ स्कीम फॉर व्हाईट गुड्स, नॅशनल सिंगल विंडो स्कीम योजना उपलब्ध आहेत.

**4) महिला कॉयर योजना** - "कौशल्य अपग्रेडेशन आणि महिला कॉयर योजना" ही योजना "कोयर विकास योजना (CVY)" चा एक घटक आहे आणि ही योजना भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाने सुरू केली आहे. "कौशल्य अपग्रेडेशन आणि महिला कॉयर योजना" या योजनेत दोन वेगळे घटक आहेत जसे की कौशल्य अपग्रेडेशन, महिला कॉयर योजना.योजनेंतर्गत, मंडळ अधिकाधिक उद्योजकांना कॉयर


Copyright © | JET Network, All Rights Reserved

प्रोसेसिंग युनिट सुरू करण्यासाठी आकर्षित करण्यासाठी उद्योजकता विकास कार्यक्रम, जागरूकता कार्यक्रम, कार्यशाळा, चर्चासत्र, एक्सपोजर टूर इत्यादी सारखे विविध कार्यक्रम आयोजित करत आहे. कॉयर उद्योगासाठी आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी मंडळ विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवत आहे जसे की मूल्यवर्धित कॉयर उत्पादनांचे उत्पादन, कताई, विणकाम आणि इतर उत्पादन विविधीकरण प्रक्रियांचे प्रशिक्षण. हे सर्व प्रशिक्षण कार्यक्रम महिला कॉयर योजनेअंतर्गत महिलांसाठी देखील उपलब्ध आहेत. योजनेची उद्दिष्टे महिला कॉयर योजनेंतर्गत ७५ टक्के अनुदानासह कॉयर सूत स्पिनिंग रॅट्स, कॉयर प्रक्रिया उपकरणे, यंत्रसामग्री इ. प्रदान करणे.उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत पारंपारिक आणि अपारंपारिक अशा दोन्ही क्षेत्रात नवीन उद्योजकांना कॉयर उद्योग आणि व्यापारात उद्यम करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि त्याद्वारे विद्यमान आणि नवीन क्षेत्रांमध्ये उद्योगाच्या विकासास गती देणे.

**5) अन्नपूर्णा योजना -** एक लोकप्रिय सरकारी उपक्रम म्हणजे अन्नपूर्णा योजना.जिथे महिला उद्योजकांना कर्ज दिले जाते. फूड कॅटरिंग व्यवसाय उघडण्यासाठी ५०,००० कर्जाची रक्कम स्वयंपाकघरातील आवश्यक वस्तूंच्या खरेदीसह खेळत्या भांडवलाच्या गरजांसाठी वापरली जाऊ शकते. तथापि, या कर्जांना तारण आणि जामीनदार आवश्यक आहे. तसेच, त्यांना ३वर्षांच्या मुदतीत परतफेड करणे आवश्यक आहे.

**6) स्त्री शक्ती योजना -** SBI चा एक उपक्रम, स्त्री शक्ती योजना केवळ अशा महिला उद्योजकांसाठी तयार करण्यात आली आहे ज्या एकतर आधीच व्यवसाय चालवत आहेत किंवा व्यवसाय चालवण्याची योजना आखत आहेत. या योजनेअंतर्गत, उत्पादन, किरकोळ किंवा सेवा क्षेत्रात गुंतलेल्या महिलांना कर्ज मिळू शकते. डॉक्टर आणि आर्किटेक्टसारख्या स्वयंरोजगार असलेल्या महिलांनाही कर्ज मिळू शकते. या योजनेअंतर्गत पात्र होण्यासाठी, महिलांनी त्यांच्या राज्य सरकारांद्वारे चालवल्या जाणाऱ्या उद्योजकता विकास कार्यक्रमांचा (EDP) भाग असणे आवश्यक आहे.

**7) महिला उद्योजकता प्लॅटफॉर्म (WEP) -** महिला उद्योजकता प्लॅटफॉर्म हे (WEP) हे एक एकीकृत प्रवेश पोर्टल आहे. जे भारतातील विविध क्षेत्रांतील महिलांना त्यांच्या उद्योजकीय आकांक्षा पूर्ण करण्यासाठी एकत्र आणते. प्लॅटफॉर्मची कल्पना सर्वप्रथम श्री. अमिताभ कांत, CEO, नीती आयोग यांनी मांडली. ज्यांनी २०१७ मध्ये हैदराबाद येथे झालेल्या 8व्या जागतिक (अंतरप्रेणारशीप) उद्योजकता समिट (GES) च्या समारोपाच्या वेळी NITI आयोगामध्ये महिला उद्योजकता प्लॅटफॉर्म स्थापन करण्याची घोषणा केली .NITI आयोगाने, SIDBI च्या भागीदारीत, विद्यमान आणि नवोदित महिला उद्योजकांना लक्ष्य करून WEP लॉंच केले आहे. ज्ञान शक्ती, इच्छा शक्ती आणि कर्म शक्ती या तीन स्तंभांवर आधारित, महिला उद्योजकांना वित्त पुरवठा, मार्गदर्शन, प्रशिक्षणार्थी आणि कॉर्पोरेट भागीदारी यासाठी सक्षम परिसंस्था प्रदान करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.सगळयात उत्तम, हे महिला उद्योजकांना समविचारी महिलांचा समुदाय तयार करण्यात मदत करते जे एकमेकांना समर्थन आणि मार्गदर्शन करू शकतात.

**निष्कर्ष**

संबंधित शोधनिबंध सादर करण्यात आलेल्या माहितीवरून असे निदर्शनास येते की, भारतात सुद्धा काही उद्योजक महिला यशस्वी झाल्या असून महिलांनी स्वतः आपल्या ज्ञान आणि कौशल्यातून उद्योग क्षेत्रात उंच भरारी घेतलेली आहे. जागतिक स्तरावर सुद्धा भारतीय महिला उद्योग जगतात विचार केला जात आहे. काही महिला आपल्या कुटुंबाचा आधार किंवा वारसा हक्काने यशस्वी उद्योजक आहेत. भारताच्या भविष्यासाठी, आर्थिक वाढीसाठी, नोकऱ्या निर्माण करण्यासाठी आणि नवनिर्मितीला चालना देण्यासाठी महिला उद्योजकता


Copyright © | JET Network, All Rights Reserved

महत्त्वाची आहे. विशेषतः ई-कॉमर्स वर लक्ष केंद्रित करून महिला उद्योजकतेच्या जगात अधिकाधिक सामील होत आहे. या विकासामुळे महिलांच्या मालकीच्या व्यवसायांमध्ये वाढ झाली आहे तसेच या कंपन्यांमध्ये महिलांनी नेतृत्वाची भूमिका घेतलेली दिसून येते. महिला ग्राहकांना पारंपारिक वस्तू ऐवजी कार्पोरेट आणि लहान ब्रँडची उत्पादने खरेदी करणे अधिक सोयीस्कर आहे. भारत असा देश आहे की, जिथे एखाद्या महिलेचे बँक खाते असणे देखील एक प्रमुख बेंच मार्क मानले जाते. सध्या १५.७ दशलक्षाहून अधिक महिलांच्या मालकीचे उद्योग आहेत ज्यात स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये महिला आघाडीवर आहेत. हे परिवर्तन भारतीय महिलांची क्षमता आणि दृढनिश्चय स्पष्टपणे दिसून येतो. एकूणच या महिलांनी भारतीय आर्थिक बाजारपेठेत जी प्रगती आणली आहे ती उल्लेखनीय आहे. त्यांच्या नेतृत्व कौशल्याने आणि नाविन्यपूर्ण विचार प्रक्रियेने महिलांसाठी आर्थिक उद्योगाची व्याख्याच बदलली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने येणाऱ्या पिढीसाठी माहितीचे शक्ती स्त्रोत म्हणून काम केले आहे.महिला उद्योजकता हा राज्याच्या आर्थिक विकासाचा महत्त्वाचा स्त्रोत आहे. महिला उद्योजकतेमुळे लैंगिक समानता आर्थिक वाढ आणि सामाजिक विकासाला देखील चालना मिळते. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन संघटन प्रस्थापित करतात. महिला उद्योजकतेमुळे महिला सक्षमीकरण घडून येते. महिला उद्योजकतेत वाढ करण्यासाठी शिक्षण तंत्रज्ञान, संस्कार, चालीरीती यासारख्या अडचणींवर मात करावी लागेल.

**संदर्भ सूची**


१. देशमुख प्रभाकर, महाराष्ट्र टाइम्स, उद्योजकता विकास संकल्पना, नागपूर २००२.
२. जोशी जयंत, उद्योजकता विकास
३. www.udyam.sakhi.com.
४. www.startupindia.gov.in
५. www.famous. entrepreneur.com. (२०२१).
६. महिला उद्योजकता व्यासपीठ, बिजनेस स्टॅंडर्ड, (२०१८).
७. आंतरराष्ट्रीय महिला दिन (२०१८).
८. WEP (वुमन अंटरप्रेनार प्लॅटफॉर्म).
९. सामंत मेधा पुरव, "मायक्रोफायनांस आणि महिला सक्षमिकरण", समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च २००९
१०. गुप्ता यु. सी. गुप्ता मीनाक्षी (२०१४) "महिला आणि उद्योजकता विकास कार्यक्रम", अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली
११. पुनिया वीरेंद्र, सिंग महिपाल (२०१३) "उद्योजकतेचा पाया", रजत प्रकाशन, नवी दिल्ली.
१२. Minstry of Micro, small, Medium Enterpreneurship, Annual Report -२०१५-१६.
१३. धमेजा एसके (२००२) " महिला उद्योजक, संधी, कामगिरी, समस्या". दीप पब्लिकेशन्स , दिल्ली.



Copyright © | JET Network, All Rights Reserved